पुढारी बुधवार, ५ फेब्रुवारी २०२५

# बुद्धिबळ : ऋषीकेश कबनूरकर यांची निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



पश्चिम भारत विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत कोल्हापुरातील ऋषीकेश कबनूरकर यांची निवड करण्यात आली.

निवड चाचणीत महाराष्ट्र, गुजरात गोवा, दीव-दमण हवेली राज्यातील १५० च्यावर खेळाडूंनी सहभाग घेतला होता. पैकी १४० हून अधिक आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग धारक खेळाडू होते. १० फेरीत ऋषीकेशने ७.५ गुण मिळवून १० क्रमांक मिळवला. त्याची निवड ४ फेब्रुवारीला नेरूळ (नवी मुंबई) येथे होणाऱ्या इंडिया चेस मास्टर विभागीय स्पर्धेसाठी झाली आहे.

ऋषीकेश विवेकानंद कॉलेजमध्ये इयत्ता १२ वीत शिकत असून, त्याला प्रशिक्षण कृष्णात पाटील, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव आदींचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत संवाद
शुक्रवार, ७ फेब्रुवारी २०२५

# प्रतिक मिस्टर विवेकानंद, शरयू मिस विवेकानंद

## विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्याकडून अभिनंदन



**कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील मिस्टर विवेकानंद प्रतिक चौगुले व मिस विवेकानंद शरयू सुतार यांच्याबरोबर प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आदी.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे गरजेचे आहे. सध्याचा काळ कौशल्य विकासाचा असून अशा काळात विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाला आकार देण्यासाठी विविध स्पर्धेमध्ये सहभागी होणे महत्त्वाचे आहे. विवेकानंद कॉलेजने विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाला आकार देण्यासाठी, त्याच्या कलागुणांचा विकास होण्यासाठी विवेकानंद महोत्सव : शोध चैतन्याचा २०२५ चे केलेले आयोजन महत्वपूर्ण आहे. या स्पर्धेत प्रतिक चौगुले मिस्टर विवेकानंद तर शरयू सुतार मीस विवेकानंद झाली आहेत, ही कौतुकास्तप गोष्ट असल्याचे मत संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केले.

विवेकानंद कॉलेजतर्फे आयोजित विवेकानंद महोत्सव : शोध चैतन्याचा २०२५ च्या सांगता समारंभात ते बोलत होते. प्राचार्य डॉ.कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते.

प्रास्ताविक विवेकानंद महोत्सवाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तू व खाद्यपदार्थांच्या स्टॉलवरही भरपूर गर्दी होती. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी अभिवाचन, नाविन्यपूर्ण संशोधन, ऍड मॅड शो, रिल फ्लिक्स, डान्स मॅजिक या स्पर्धांचे तर दुसऱ्या दिवशी फन फेअर आणि मिस्टर अँण्ड मिस विवेकानंद स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. फन फेअरचे उदघाटन संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, सिनेअभिनेत्री ज्योत्स्नाराजे गायकवाड तर मिस्टर अँण्ड मिस विवेकानंद स्पर्धेसाठी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, रोहित कारगावे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या स्पर्धेतील अभिवाचन स्पर्धेसाठी डॉ. रमेश साळुंखे, प्रा. श्रीराम मोहिते, ॲडड मॅड शोसाठी एम. एम. शिंदे व मिताली गाठे यांनी, आयडियाथॉन साठी डॉ.संतोष मस्के व आदित्य सुर्वे, डान्स मॅजिक साठी विकास पोवार व गणेश इंडीकर, मिस्टर व मिस विवेकानंद साठी तिल्लोतमा देशमुख व शितल पाटील, रिल फ्लिक्ससाठी विष्णू वजार्डे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या स्पर्धांमध्ये कोल्हापूर, सातारा, सांगली, पुणे, सोलापूर, मुंबई येथील अनेक महाविद्यालये सहभागी झाली होती. वरील स्पर्धेतील सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

07/02/2025

7.2.25

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, ८ फेब्रुवारी २०२५

# विवेकानंद महाविद्यालयातील आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणास प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी कक्ष व जीवन मुक्ती सेवा संस्था (व्हाईट आर्मी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना व्हाईट आर्मीचे संस्थापक अध्यक्ष अशोक रोकडे यांनी आपत्ती व्यवस्थापनाची देशाला असलेली गरज आणि त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी परंपरागत अभ्यासक्रमाव्यतिरिक्त एन.एस.एस., एन.सी.सी, स्पोर्टस्, आपत्ती व्यवस्थापन यासारख्या गोष्टींची गरज आजच्या शिक्षण व्यवस्थेत अनिवार्य असल्याचे मत व्यक्त केले. नोडल ऑफिसर डॉ. सी. बी. पाटील यांनी प्रस्ताविक केले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. अभिजित कासारकर यांनी केले.

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, ८ फेब्रुवारी २०२५

# विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची कॅन्सर प्रबोधन जनजागृती रॅली

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातर्फे जागतिक कॅन्सर दिनानिमित्त जनजागृती रॅली काढण्यात आली. बदलती जीवनशैली, बदलत चाललेला आहार व जगण्याच्या पद्धती या कॅन्सर सारख्या आजारास निमंत्रण देत आहेत. विकसित देशात कॅन्सर रुग्णांचे प्रमाण जास्त, मात्र मृत्यू दर कमी आणि भारतासारख्या देशात कॅन्सर रुग्णांचे प्रमाण कमी मात्र मृत्यूदर जास्त हे फक्त चुकीच्या जीवनशैलीमुळे होत आहे, असे मत आरंभ पॅलीएटिव्ह कॅन्सर केअर सेंटरचे प्रमुख प्रदीप काकडे यांनी व्यक्त केले. विवेकानंद महाविद्यालय ते कलेक्टर ऑफिस दरम्यान प्रबोधन काढण्यात आली. रॅलीची सांगता जिल्हाधिकारी कार्यालयात प्लास्टिक वापरावर खाण्यापिण्याच्या पदार्थामधून बंदीचा निवेदनातून झाली. रॅलीचे आयोजन कॉलेजचे प्राचार्य आर. आर. कुंभार, आयक्यूएसी प्रमुख डॉ. श्रुती जोशी, ज्युनिअर आर्टस् कॉमर्स विभाग प्रमुख प्रा. शिल्पा भोसले, मेजर सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा प्रा. यू. एच. तिजाईकर, प्रा. पी. वाय. राठोड, प्रा. पी. आर. बागडे, प्रबंधक रघुनाथ जोग यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. जिल्हाधिकारी कार्यालयात काजल टोपले या ब्लड कॅन्सरवर मात केलेल्या मुलीचा विशेष सत्कार करण्यात आला.

08/02/2025

8/2/2025

तरुण भारत संवाद
शनिवार दि. ८ फेब्रुवारी २०२५

# चेस टूर्नामेंटसाठी ऋषिकेशची निवड

## पश्चिम विभागीय संघातून करणार प्रतिनिधीत्व

प्रतिनिधी
कोल्हापूर

नेरुळ (नवी मुंबई) येथे १७ फेब्रुवारी रोजीपासून आयोजित केल्या जात असलेल्या कोल्हापुरातील आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू ऋषिकेश कबनूरकर याची एसओजी ग्रॅण्डमास्टर सिरीज झोनल फायनल चेस टुर्नामेंटसाठी पश्चिम विभागीय संघात निवड करण्यात आली.

अलीकडेच पश्चिम भारत विभाग बुद्धिबळ स्पर्धेचे ऑनलाईन स्वरुपात आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाराष्ट्र, गोवा, गुजरात, दिव, दमण, नगर-हवेली येथील १५० वर बुद्धिबळपटू सहभागी झाले होते.

या स्पर्धेत महाराष्ट्रातर्फे प्रतिनिधीत्व केलेल्या ऋषिकेशने साडे सात गुण मिळवून दहावा क्रमांक मिळवला. या कामगिरीमुळे त्याची नेरुळ येथे होणाऱ्या एसओजी सिरीज टुर्नामेंटसाठी पश्चिम विभागीय संघात निवड करण्यात आली. दरम्यान, या शानदार कामगिरीमुळे त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.



ऋषीकेशसह अन्य १५ बुद्धिबळपटूंचीही त्यांच्या विभागांमार्फत टुर्नामेंटसाठी निवड केली आहे. टुर्नामेंटमध्ये यशस्वी होणाऱ्या बुद्धिबळपटूंना लर्नॅशनल टुर्नामेंटसाठी पात्र ठरवले जाणार आहे. ऋषिकेश हा विवेकानंद कॉलेजचा विद्यार्थी असून त्याला प्रशिक्षण कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

पुण्यनगरी
रविवार, ९ फेब्रुवारी २०२५

# 'विवेकानंद' च्या विद्यार्थ्यांची राजाराम साखर कारखान्यास क्षेत्र भेट

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील बी.एस्सी. भाग-३ मधील विद्यार्थ्यांनी 'औद्योगिक क्षेत्र भेटी' अंतर्गत छत्रपती राजाराम साखर कारखान्यास भेट दिली. इंडस्ट्रियल केमिस्ट्री विषयांतर्गत विद्यार्थ्यांनी साखर उत्पादन प्रक्रियेतील विविध टप्पे प्रत्यक्ष पाहून समजावून घेतले. तसेच इथेनॉल निर्मिती विभाग व इतर उपपदार्थ उत्पादनांची माहिती घेतली. याचे नियोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस. डी. शिर्के, प्रबंधक आर. बी. जोग यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. ए. एन. अंभोरे, प्रा. एस. एस. कदम यांनी केले. याप्रसंगी प्रा. सुमित लाड, प्रा. डी. एस. पाटील, प्रा. एस. व्ही. जाधव आदी उपस्थित होते.

.2.2025

.2.25

पुण्य नगरी

रविवार, ९ फेब्रुवारी २०२५

# वक्तृत्व स्पर्धेत ढाकर, कुरणे, कमळकर विजयी

## शहाजी छत्रपती महाविद्यालयात निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण

कोल्हापूर : प्रतिनिधी

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातर्फे घेतलेल्या वक्तृत्व स्पर्धेचा निकाल घोषित झाला. यातील विजेते अनुक्रमे, भारती विद्यापीठातील बीसीएचा विद्यार्थी विशाल ठाकर, न्यू कॉलेजच्या श्रुती कुरणे, देवचंद कॉलेज अर्जुननगरची सह्याद्री कमळकर असे आहेत. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्ण जयंती महोत्सवी वर्षानिमित्त आणि श्रीपतराव बोंद्रे जयंतीनिमित्त या स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेत गोपाळ कृष्ण गोखले कॉलेजच्या साक्षी जाधव आणि विवेकानंद कॉलेजच्या अनुराधा कांबळे यांनी उत्तेजनार्थ क्रमांक पटकावले. तर पदवी स्तरावरील निबंध लेखन स्पर्धेतील विजेते अनुक्रमे, चंद्राबाई शांतापा कॉलेज हुपरीची विद्यार्थिनी निकिता कांबळे, म्हैसाळ महाविद्यालयाची विद्यार्थिनी भाग्यश्री कांबळे, एस. के. पाटील महाविद्यालय कुरुंदवाडची नेहा कोल्हापुरे, शहाजी महाविद्यालयातील इरम अब्दुल रहिम खान, प्रतीक्षा भोसले यांनी उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले.

प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. डी. के. वळवी, केएमसी कॉलेजचे मराठी विभागप्रमुख डॉ. प्रशांत नागावकर, विठ्ठलराव पाटील कळे, महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. महादेव जाधव यांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. आयक्यूएसी समन्वयक डॉ. आर. डी. मांडणीकर, डॉ. ए. बी. बलुगडे, ग्रंथपाल डॉ. पांडुरंग पाटील, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. एन. एस. जाधव, हिंदी विभागप्रमुख डॉ. एस. एस. पाटील, प्रा. पी. के. पाटील आदी उपस्थित होते.

डॉ. डी. के. वळवी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पल्लवी कोडक यांनी आभार मानले. डॉ. रचना माने यांनी सूत्रसंचालन केले. श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे यांचे या उपक्रमास प्रोत्साहन मिळाले.

९/२/२०२५

पुढारी MY कोल्हापूर सोमवार, १० फेब्रुवारी २०२५

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांची राजाराम साखर कारखान्यास क्षेत्र अभ्यास भेट

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील बी.एस्सी. भाग-३ मधील विद्यार्थ्यांची 'औद्योगिक क्षेत्र भेटी' अंतर्गत कसबा बावडा येथील छत्रपती राजाराम सहकारी साखर कारखान्यास भेट दिली. इंडस्ट्रियल केमिस्ट्री विषयांतर्गत विद्यार्थ्यांनी साखर उत्पादन प्रक्रियेतील विविध टप्पे प्रत्यक्ष पाहून समजावून घेतले. तसेच इथेनॉल निर्मिती विभाग व उपपदार्थ उत्पादनांची माहिती घेतली. औद्योगिक क्षेत्र भेटीचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस. डी. शिर्के, प्रबंधक श्री. आर. बी. जोग यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. ए. एन. अंभोरे व प्रा. एस. एस. कदम यांनी यशस्वी केले. यावेळी प्रा. सुमित लाड, प्रा. डी. एस. पाटील, प्रा. एस. व्ही. जाधव आदी उपस्थित होते.

तरुण भारत संवाद

मंगळवार, ११ फेब्रुवारी २०२५

# विवेकानंद महाविद्यालयात क्रीडा महोत्सव बक्षीस वितरण

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर व रोटरॅक्ट क्लब ऑफ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विवेकानंद महाविद्यालयामध्ये क्रीडा महोत्सव बक्षीस वितरण समारंभ पार पडला. या क्रीडा महोत्सव स्पर्धेमध्ये बुध्दीबळ, कॅरम, बॅडमिंटन, खो–खो, बास्केटबॉल, कबड्डी, फुटबॉल व क्रिकेट अशा आठ क्रीडा स्पर्धांचा समावेश असून या स्पर्धेमध्ये तब्बल महाविद्यालयामधील विविध शाखेतून ६५० खेळाडूंचा समावेश होता. प्रमुख पाहुणे प्रा. किरण पाटील म्हणाले, अभ्यासाबरोबर खेळाच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास करणे अतिशय महत्वाचे आहे. रोटरी क्लब ऑफ स्मार्ट सिटीच्या वरणा वडगावकर यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. श्रुती जोशी, प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन केले होते. स्वागत व प्रास्ताविक जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संतोष कुंडले यांनी केले. आभार विराज खानविलकर यांनी मानले. यावेळी रजिस्ट्रार आर. बी. जोग, प्रशासकीय सेवक सुरेश चरापले प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, जयेश चव्हाण मुज्जमिल सनदी, प्रतीक मोरे, अभी मनेर, संस्कार सदलगे, ऋग्वेद मंगल, पियुष मोरे, मधुरा पाटील आदी उपस्थित होते.

तरुण भारत संवाद

मंगळवार ११ फेब्रुवारी २०२५

# राष्ट्रीय शिबिरातील सहभागी एनसीसी छात्रांचा सत्कार

**कोल्हापूर :** प्रजासत्ताक दिनाच्या परेडसाठी दिल्ली अंडर ऑफिसर समिधा घुगरे (बी. कॉम. भाग ३), आर्मी दिवस परेडसाठी अंडर ऑफिसर निशा बजागे (बी. ए. भाग ३) आणि जम्मू काश्मीर येथे बर्फातील हिवाळी धाडसी खेळ प्रशिक्षण शिबिरात उत्कृष्ट सहभाग घेणाऱ्या अंडर ऑफिसर शरयू सुतार (बी. एस्सी. भाग ३) या तीन एन.सी.सी. छात्रांचा सत्कार प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते करण्यात आला. या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन केले. यावेळी डॉ. उर्मिला खोत, डॉ. सनी काळे, रजिस्ट्रार आर.बी.जोग, किरण घुगरे, मेजर सुनिता भोसले, लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा, ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एन.सी.सी. चे कर्नल संधान मिश्रा आदी उपस्थित होते.

पुण्य नगरी
मंगळवार, ११ फेब्रुवारी २०२५

# 'विवेकानंद'चा क्रीडा महोत्सव उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद महाविद्यालय आणि रोटरॅक्ट क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने विवेकानंद महाविद्यालयामध्ये क्रीडा महोत्सव बक्षीस वितरण समारंभ झाला. या स्पर्धेमध्ये विविध शाखांतून ६५० खेळाडू सहभागी झाले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिमखाना विभागप्रमुख प्रा. किरण पाटील उपस्थित होते. त्यांनी मनोगतमध्ये अभ्यासाबरोबर खेळांचे महत्त्व पटवून दिले. रोटरी क्लब ऑफ स्मार्ट सिटीच्या वारणा वडगावकर, महाविद्यालयाच्या आयक्यूएसी विभाग समन्वयक डॉ. श्रुती जोशी आदींनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधवल यांनी, सूत्रसंचालन प्रा. संतोष कुंडले यांनी केले. आभार विराज खानविलकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, जयेश चव्हाण, मुज्जमिल सनदी, प्रतीक मोरे, अभी मणेर, संस्कार सदलगे, ऋग्वेद मंगल, पीयूष मोरे, मधुरा पाटील, रजिस्ट्रार आर. बी. जोग, प्रशासकीय सेवक सुरेश चरापले यांचे सहकार्य लाभले.

पुढारी बुधवार, १२ फेब्रुवारी २०२५

# 'विवेकानंद'च्या क्रीडा महोत्सवास प्रतिसाद

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालय व रोटरॅक्ट क्लब ऑफ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये क्रीडा महोत्सव बक्षीस वितरण समारंभ कार्यक्रम पार पडला. क्रीडा महोत्सवामध्ये बुद्धिबळ, कॅरम, बॅडमिंटन, खो-खो, बास्केटबॉल, कबड्डी, फुटबॉल व क्रिकेट आधी क्रीडा स्पर्धांचा समावेश होता. स्पर्धेमध्ये महाविद्यालयामधील विविध शाखेतून ६५० खेळाडू सहभागी झाले होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिमखाना विभागप्रमुख प्रा. किरण पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. मनोगतामध्ये त्यांनी अभ्यासाबरोबर खेळाचे महत्त्व पटवून दिले. याप्रसंगी रोटरी क्लब ऑफ स्मार्ट सिटीच्या वरणा वडगावकर, आयक्यूएसी विभाग समन्वयक डॉ. श्रुती जोशी उपस्थित होत्या. जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन प्रा. संतोष कुंडले यांनी केले. विराज खानविलकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, जयेश चव्हाण मुज्जमिल सनदी, प्रतीक मोरे, अभी मनेर, संस्कार सदलगे, ऋग्वेद मंगल, पीयूष मोरे, मधुरा पाटील यांनी परिश्रम घेतले.

12/2/2025

PR
12/2/25

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, १५ फेब्रुवारी २०२५

# विवेकानंद महाविद्यालयात मंगळवारी आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलन

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाच्या वतीने मंगळवारी (दि. १८) विवेकानंद कॉलेजच्या ग्रंथालय सभागृहामध्ये सकाळी ९.३० वाजता चौथ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाचे उद्घाटन शिक्षणतज्ज्ञ व लेखक प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांच्या हस्ते व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. प्रथम सत्रात युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक नवनाथ गोरे यांची प्रकट मुलाखत होणार आहे. दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. भीमराव धुळूबुळू यांच्या अध्यक्षतेखाली युवा कविसंमेलन होणार आहे. साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष विद्यार्थी प्रतिनिधी निधी कुलकर्णी असणार आहे. विद्यार्थी, प्राध्यापक व साहित्यिक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, संमेलनाचे समन्वयक डॉ. एकनाथ आळवेकर यांनी केले.

पुढारी संमिश्र कोल्हापूर, शनिवार, १५ फेब्रुवारी २०२५

# अ. भा. आंतरविद्यापीठ आईस स्टॉक स्पर्धेत विवेकानंद कॉलेजचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कश्मीर गुलमर्ग येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ आईस स्टॉक स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूरच्या गायत्री लोळगे, वैष्णवी पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाकडून प्रतिनिधित्व करत आईस स्टॉक खेळामध्ये टीम टार्गेट व टीम डिस्टन्स खेळ प्रकारात सुवर्णपदक मिळविले. स्पर्धासाठी भारतामधून विविध विद्यापीठातून ४५ विद्यापीठांचा समावेश होता.

यशस्वी खेळाडूंना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, रजिस्ट्रार आर. बी. जोग व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

हॅलो प्रभात

दि 20/2/2025

# विवेकानंदमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

कोल्हापूर : हॅलो प्रभात

विवेकानंद कॉलेजमध्ये इतिहास विभागाच्यावतीने शिवजयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. कुंभार यांच्याहस्ते महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करणेत आले.

यावेळी प्रास्ताविक व स्वागत इतिहासविभाग प्रमुख डॉ.एस.आर.कट्टीमनी यांनी केले. प्रसंगी बोलताना ते म्हणाले, जातीधर्माच्या भिंती भेदून, माणसाला माणूसकीने जगायला शिकवणारे राज्य म्हणजे शिवरायांचे स्वराज्य, महाराज हे मानवी मूल्ये जोपासणाऱ्या विचारांचे, तत्ववेता राजे होते. त्यांनी मानवी मूल्यांसाठी कधीही तडजोड केली नाही. लोककल्याणकारीशासनव्यवस्था



हे त्यांचे अंतिम ध्येय होते.

**मान्यवरांची उपस्थिती**

डॉ. कविता तिवडे यांनी आभार व्यक्त केले. यावेळी प्रा. एस. पी. थोरात, प्रा. एस. एस. कुंडले, डॉ. विकास जाधव, प्रा. एस. एस. थोरात, प्रा. एम आर नवले, प्रा. एस एस अंकुशराव, डॉ. डी. आर. तुपे, एन. सी. सी. यांच्यासह महाविद्यालयातील ज्युनिअर व सिनिअर कॉलेजचे प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

21/2/25

हॅलो प्रभात

दि. 22/0

# 'विवेकानंद'मध्ये रंगले युवा साहित्य संमेलन

कोल्हापूर : हॅलो प्रभात

नव्या पिढीचे साहित्य विद्यार्थ्यांनी वाचले पाहिजे. मातृभाषेत जेवढे व्यक्त होता येते तेवढे दुसऱ्या भाषेमध्ये व्यक्त होता येत नाही. मातृभाषेच्या विकासासाठी जास्तीत जास्त वाचन व लेखन करणे गरजेचे आहे.

मातृभाषेच्या विकासाचे बाळकडू शैक्षणिक प्रक्रियेमध्ये विकसित होते. विविध छंद जोपासल्याने जीवनात सर्जनशीलतेला व सृजनशीलतेला वाव मिळतो. धावपळीच्या जीवनात आयुष्याला उभं करण्यासाठी माणूस सतत संघर्ष करीत आहे. हा संघर्ष साहित्यातून चित्रित होत असतो. त्यासाठी युवकांच्या साहित्यप्रज्ञेचा शोध घेण्यासाठी आणि नवोदितांच्या सर्जनशीलतेला मुक्त व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी अशा युवा साहित्य संमेलनांची आवश्यकता असते, असे प्रतिपादन प्रसिध्द शिक्षणतज्ज्ञ व लेखक प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले. ते विवेकानंद महाविद्यालयातील वाड्.मय मंडळ आणि आय. क्यु. ए. सी. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या चौथ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाच्या उदघाटन प्रसंगी उदघाटक म्हणून बोलत होते. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकांनद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व आय. क्यु. ए. सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनासाठी विद्यार्थी, प्राध्यापक आणि साहित्य रसिक मोठया संख्येने उपस्थित होते.

हॅलो प्रभात

# 'विवेकानंद'मध्ये रंगले युवा साहित्य संमेलन

कोल्हापूर : हॅलो प्रभात

नव्या पिढीचे साहित्य विद्यार्थ्यांनी वाचले पाहिजे. मातृभाषेत जेवढे व्यक्त होता येते तेवढे दुसऱ्या भाषेमध्ये व्यक्त होता येत नाही. मातृभाषेच्या विकासासाठी जास्तीत जास्त वाचन व लेखन करणे गरजेचे आहे.

मातृभाषेच्या विकासाचे बाळकडू शैक्षणिक प्रक्रियेमध्ये विकसित होते. विविध छंद जोपासल्याने जीवनात सर्जनशीलतेला व सृजनशीलतेला वाव मिळतो. धावपळीच्या जीवनात आयुष्याला उभं करण्यासाठी माणूस सतत संघर्ष करीत आहे. हा संघर्ष साहित्यातून चित्रित होत असतो. त्यासाठी युवकांच्या साहित्यप्रज्ञेचा



शोध घेण्यासाठी आणि नवोदितांच्या सर्जनशीलतेला मुक्त व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी अशा युवा साहित्य संमेलनांची आवश्यकता असते, असे प्रतिपादन प्रसिध्द शिक्षणतज्ज्ञ व लेखक प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले. ते विवेकानंद महाविद्यालयातील वाङ्मय मंडळ आणि आय. क्यु. ए. सी. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या चौथ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाच्या उदघाटन प्रसंगी उदघाटक म्हणून बोलत होते. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकांनद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व आय. क्यु. ए. सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनासाठी विद्यार्थी, प्राध्यापक आणि साहित्य रसिक मोठया संख्येने उपस्थित होते.

लोकमत
कोल्हापूर, शनिवार, दि. २२ फेब्रुवारी २०२५

# पथनाट्य स्पर्धेमध्ये मंडलिक कॉलेज प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

**इचलकरंजी :** राज्यस्तरीय युवास्पंदन स्पर्धा उपक्रमाच्या समारोपदिवशी आविष्कार पथनाट्य स्पर्धेत मंडलिक कॉलेज (मुरगुड), तर लघुनाटिका स्पर्धेत कला स्पंदन क्रिएशन (पाटण) यांनी प्रथम क्रमांक मिळविला. मनोरंजन मंडळ, श्री दगडूलाल मर्दा फाउंडेशन आणि रोटरी क्लब सेंट्रलच्यावतीने या स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

पथनाट्य स्पर्धेत भाग घेतलेल्या संघांनी भ्रष्टाचार, संविधान साक्षरता, पर्यावरण व आरोग्य, जातीयवाद, धर्मांधता आदी विषयांवर भाष्य करणारी पथनाट्ये सादर केली. स्पर्धेत नानासाहेब महाडिक शैक्षणिक संकुल (पेठनाका) व कला स्पंदन क्रिएशन (पाटण) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. लघुनाटिका स्पर्धेतील संघांनी समाजातील सद्य:स्थिती, सोशल



इचलकरंजीतील पथनाट्य स्पर्धेतील विजेत्या मंडलिक कॉलेजचा गौरव केला.

मीडिया, मराठी भाषेची सद्य:स्थिती, स्त्री-पुरुष समानता, व्यसनमुक्ती, उपहास, उपरोध व विडंबन अशा विविध शैलींमधून मांडले. स्पर्धेत परिस स्पर्श (कराड) व विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर) यांनी द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. दोन्ही स्पर्धेसाठी प्रकाश पाटील (राधानगरी), सत्याप्पा मोरे (इस्लामपूर) व प्रवीण साळुंखे (पुणे) यांनी परीक्षक होते.

संजय होगाडे यांनी स्वागत व समीर गोवंडे यांनी प्रास्ताविक केले. मान्यवरांच्या हस्ते विजयी संघांना पारितोषिक दिले. घोरपडे नाट्यगृहात झालेल्या स्पर्धेसाठी इचलकरंजी, कोल्हापूर, सांगली, कराड, इस्लामपूर या भागातील स्पर्धकांनी सहभाग घेतला.

२१/०२/२०२५

२२/२/२५

पुढारी कोल्हापूर रविवार, २३ फेब्रुवारी २०२५

# जीवनात यश मिळवण्यासाठी चिकाटी, संयम महत्त्वाचा

## प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थिदशेत सर्व विद्यार्थ्यांनी सोशल मीडियापासून दूर राहावे. जीवनात यश मिळविण्यासाठी चिकाटी व संयम आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी व्यक्त केले.

विवेकानंद महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त केलेल्या क्रांती बेनाडे व तेजश्री गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. पत्रकारिता, अध्यापन, संशोधन, राजकारण, प्रशासन, समाजसेवा आदी क्षेत्रांत करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. त्याचा विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा, असे आवाहन प्रा. डी. ए. पवार यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. दत्ता जाधव यांनी केले. सूत्रसंचालन सायली वाडकरने केले. डॉ. अवधूत टिपुगडे यांनी आभार मानले.

24.2.25

महाराष्ट्राचे लोकप्रिय दैनिक
पुण्य नगरी
कोल्हापूर मंगळवार, २५ फेब्रुवारी २०२५

# सतीश तांदळे यांची निवड



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर यांच्या अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून सतीश तांदळे यांची निवड करण्यात आली आहे. इंग्रजी भाषा व साहित्य हा अभ्यासक्रम तयार करण्यासाठी ही निवड करण्यात आली असून इंग्रजी विषयातील अनेक तज्ज्ञ या अभ्यास मंडळावर आहेत. सतीश तांदळे यांची ही निवड २०२४ - २४ आणि २०२६-२७ या शैक्षणिक वर्षांसाठी करण्यात आलेली आहे. उदयोन्मुख युवा लेखक, अभिनेता व दिग्दर्शक म्हणून सतीश तांदळे परिचित आहेत.

# मानवातील कौशल्य पूर्णतेमुळे जीआयएस प्रणाली व्यवस्थित काम करू शकते : डॉ. उबाळे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मानवातील कौशल्य पूर्णतेमुळे जीआयएस प्रणाली व्यवस्थित काम करू शकते, असे प्रतिपादन डॉ. जी. एस. उबाळे यांनी केले. विवेकानंद महाविद्यालय येथे प्राध्यापक प्रबोधनीच्या वतीने आयोजित 'जीआयएस सुदूर संवेदनांचा परिचय आणि उपयोजन'या विषयावरील व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी गणित विभागप्रमुख प्रा. एस. पी. थोरात होते.

व्याख्यानात डॉ. उबाळे यांनी प्रारंभी भूगोलाची व्याख्या सांगून जीआयएस ही संकल्पना स्पष्ट केली. जीआयएसद्वारे भौगोलिक क्षेत्रामध्ये कोणकोणती कामे चालतात याविषयीची उदाहरणे दिली.

प्राध्यापक प्रबोधिनीचे समन्वयक प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी प्रस्ताविक केले. डॉ. डी. बी. दांगट यांनी आभार मानले. प्रा. अश्विनी खवळे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे कार्यक्रमासाठी मार्गदर्शन लाभले. आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, प्रा. ए. बी. वसेकर, डॉ. प्रदीप पाटील, रजिस्ट्रार आर. बी. जोग आदी उपस्थित होते.

पुढारी

माघ, कृ. १२, शके १९४६, श्री शिवशक ३५१
मंगळवार, २५ फेब्रुवारी २०२५

# जीवनात यश मिळविण्यासाठी चिकाटी, संयम आवश्यक : प्राचार्य कुंभार

**कोल्हापूर :** विद्यार्थी दशेत सर्व विद्यार्थ्यांनी सोशल मीडियापासून दूर राहावे. जीवनात यश मिळविण्यासाठी चिकाटी व संयम आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात स्पर्धा परीक्षेत यश मिळविलेल्या क्रांती बेनाडे व तेजश्री गायकवाड यांचा गौरव करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. अतिथी व्याख्यानात प्रा. डी. ए. पवार म्हणाले, राज्यशास्त्र विषयात पत्रकारिता, अध्यापन, संशोधन, राजकारण, प्रशासन, समाजसेवा आदी क्षेत्रांत करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. त्याचा विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा. प्रा. दत्ता जाधव यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सायली वाडकर हिने केले. डॉ. अवधूत टिपुगडे यांनी आभार मानले.

लोकमत

कोल्हापूर, मंगळवार, दि. २५ फेब्रुवारी २०२५

# सतीश तांदळे अभ्यास मंडळावर



**कोल्हापूर :** उदयोन्मुख युवा लेखक, अभिनेता व दिग्दर्शक सतीश सदाशिव तांदळे (रा. निवडे, ता. पन्हाळा) यांची विवेकानंद महाविद्यालयातील अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून निवड करण्यात आली. इंग्रजी भाषा व साहित्य हा अभ्यासक्रम तयार करण्यासाठी ही निवड करण्यात आली असून, इंग्रजी विषयातील अनेक तज्ज्ञ या अभ्यास मंडळावर आहेत. सतीश तांदळे यांनी दिग्दर्शित केलेला जियारत हा मराठी हिंदी इंग्रजी व ऊर्दू भाषेतील 'साहित्याची प्रेमयात्रा' हा शो राज्यभर गाजत आहे.

पुढारी

कोल्हापूर, मंगळवार, २५ फेब्रुवारी २०२५

# मानवातील कौशल्य पूर्णतेमुळे जीआयएस प्रणाली व्यवस्थित काम करू शकते : डॉ. उबाळे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मानवातील कौशल्य पूर्णतेमुळे जीआयएस प्रणाली व्यवस्थित काम करू शकते, असे प्रतिपादन डॉ. जी. एस. उबाळे यांनी केले. विवेकानंद महाविद्यालय येथे प्राध्यापक प्रबोधनीच्या वतीने आयोजित 'जीआयएस सुदूर संवेदनांचा परिचय आणि उपयोजन'या विषयावरील व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी गणित विभागप्रमुख प्रा. एस. पी. थोरात होते.

व्याख्यानात डॉ. उबाळे यांनी प्रारंभी भूगोलाची व्याख्या सांगून जीआयएस ही संकल्पना स्पष्ट केली. जीआयएसद्वारे भौगोलिक क्षेत्रामध्ये कोणकोणती कामे चालतात याविषयीची उदाहरणे दिली.

प्राध्यापक प्रबोधिनीचे समन्वयक प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी प्रस्ताविक केले. डॉ. डी. बी. दांगट यांनी आभार मानले. प्रा. अश्विनी खवळे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे कार्यक्रमासाठी मार्गदर्शन लाभले. आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, प्रा. ए. बी. वसेकर, डॉ. प्रदीप पाटील, रजिस्ट्रार आर. बी. जोग आदी उपस्थित होते.